# राज्यातील शेतकऱ्यांचे देशाबाहेर अभ्यास दौरे
# राज्य पुरस्कृत योजना
# मार्गदर्शक सूचना सन २०२३-२४

**प्रस्तावना -**

राज्यातील शेतकऱ्यांचे केवळ उत्पादन व उत्पादकता वाढविणे हे ध्येय यापुढे न राहता उत्पादीत होणाऱ्या शेतीमालाची दर्जात्मक सुधारणा करण्यासाठी नवीन तंत्रज्ञानाचा वापर शेतकऱ्यांनी करणे अत्यंत गरजेचे आहे. शेतीशी निगडीत घटकांबाबत जगात वेळोवेळी होत असलेले बदल, विकसित होत असलेले तंत्रज्ञान हे शेतकऱ्यांपर्यंत त्यांच्या गरजेनुरुप योग्यवेळी पोहोचविणे आणि त्यासाठी आवश्यक सहाय्य व सोयीसुविधा पुरविणे निकडीचे आहे. कृषि विस्तार कार्यक्रमाद्वारे शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती देण्याकरीता करावयाच्या विविध उपाययोजनांसाठी कृषि विभागाकडून त्यादृष्टीने प्रयत्न करण्यात येत आहेत.

विविध देशांनी विकसित केलेले शेतीविषयक तंत्रज्ञान व तेथील शेतकऱ्यांनी त्याचा केलेला अवलंब व त्याद्वारे त्यांच्या उत्पन्नात झालेली वाढ याबाबत त्या त्या देशातील शास्त्रज्ञ, शेतकरी यांच्याशी प्रत्यक्ष चर्चा, क्षेत्रिय भेटी तसेच संस्थांना भेटी इ. द्वारे शेतकऱ्यांचे ज्ञान आणि क्षमता उंचावण्याकरीता राज्यातील शेतकऱ्यांचे देशाबाहेर अभ्यास दौरे आयोजित करणे, हे या योजनेचे उद्दीष्ट आहे. त्यानुसार सन २०२३-२४ मध्ये राज्यातील शेतकऱ्यांचे देशाबाहेरील अभ्यास द्यौऱ्याचे आयोजन करण्यात येत आहे. सदर योजनेंतर्गत जर्मनी, फ्रांस, स्पेन, स्वित्झरलँड, ऑस्ट्रीया, न्यूझीलँड, नेदरलँड, व्हिएतनाम, मलेशिया, थायलँड, पेरू, ब्राझील, चिली, ऑस्ट्रेलिया, सिंगापूर ई. संभाव्य देशांची निवड करण्यात आली आहे.

राज्यातील विविध पिकांची उत्पादकता, पीक पध्दतीमधील आधुनिक तंत्रज्ञान, कृषि उत्पादनांचे बाजार व्यवस्थापन, निर्यातीच्या संधी, कृषि प्रक्रियेमधील अद्ययावत पध्दती यामध्ये आमुलाग्र बदल आणण्यासाठी शेतकऱ्यांमध्ये जागरुकता निर्माण करणे हा योजनेचा मुख्य उद्देश आहे. राज्यातील योग्य त्या प्रगतशिल शेतकऱ्यांची विविध स्तरावरील समित्यांमार्फत अंतिम निवड करुन परदेशातील आधुनिक कृषि तंत्रज्ञान पाहण्याची संधी त्यांना उपलब्ध करण्यासाठी सदर मार्गदर्शक सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

राज्यातील शेतकऱ्यांचे देशाबाहेर अभ्यास दौरे ही योजना अधिक परिणामकारकपणे राबविण्यासाठी खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

**शेतकरी निवडीचे निकष-**

१. अभ्यास दौऱ्याकरीता जाणारा लाभार्थी हा स्वत: शेतकरी असावा.

२. स्वत:च्या नावे चालू कालावधीचा ७/१२ व ८-अ उतारा असणे आवश्यक आहे.

३. शेतकऱ्याच्या उत्पन्नाचे मुख्य साधन शेती असावे व तसे त्याने स्वयंघोषणापत्रात नमूद करावे (प्रपत्र-१)

४. शेतकरी कुटूंबामधून फक्त एकाच व्यक्तीला या योजनेचा लाभ घेता येईल. निवडलेल्या लाभार्थी शेतकऱ्याने स्वखर्चाने जरी इतर कुटुंब सदस्यास सोबत घ्यावयाचे असेल तरी सहल व्यवस्थापनास येणाऱ्या संभाव्य अडचणीमुळे त्यास परवानगी दिली जाणार नाही. सोबत शिधापत्रिकेची झेरॉक्स प्रत जोडावी (कुटूंब या व्याख्येमध्ये पती, पत्नी व १८ वर्षाखालील मुले/मुली)

५. शेतकऱ्याने त्याच्या आधार प्रमाणपत्राची प्रत जोडणे आवश्यक आहे.

६. शेतकरी किमान बारावी पास असावा. बारावी पास झाल्याचे प्रमाणपत्र अजासोबत जोडणे बंधनकारक आहे.

७. शेतकऱ्याचे वय सहलीला निघण्याच्या दिवशी २५ वर्षे पूर्ण व सहल समाप्त होण्याच्या अंतिम दिवशी ६० वर्षांपेक्षा जास्त नसावे .(त्यासाठी पारपत्रानुसार वयाची पडताळणी करावी)

८. शेतकरी वैध पारपत्रधारक (पासपोर्ट) असावा. पुराव्यासाठी पारपत्राची मुदत/वैधता दर्शविणाऱ्या पानाची झेरॉक्स प्रत जोडावी. पारपत्राची वैध मुदत दौरा निघण्यापूर्वी किमान सहा महिने असावी.

९. शेतकरी शासकीय, निमशासकीय, सहकारी, खाजगी संस्थेत नोकरीस नसावा. तसेच वैद्यकीय क्षेत्रातील डॉक्टर, वकील, सीए (चार्टड अकाउंटंट), अभियंता, कंत्राटदार इ. नसावा. तसे त्याने स्वत: स्वयंघोषणापत्रात नमूद करावे. (प्रपत्र-१)

१०. शेतकऱ्याने यापूर्वी शासकीय (केंद्र/राज्य शासनाच्या कोणत्याही विभागामार्फत, कृषि विद्यापिठामार्फत तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत) अर्थसहाय्याने विदेश दौरा केलेला नसावा. तसे त्याने स्वत: स्वयंघोषणापत्रात नमूद करावे. (प्रपत्र-१)

११. शेतकऱ्याची अभ्यास दौऱ्यासाठी निवड झाल्याचे पत्र कृषि विभागाकडून मिळाल्यानंतर शेतकऱ्याने परदेश दौर्यासाठी शारीरिकदृष्ट्या तंदुरुस्त असल्याबाबतचे वैद्यकीय प्रमाणपत्र (किमान एम.बी.बी.एस. डॉक्टरचे) सादर करावे. कोरोनाविषयक तपासणी करुन तसा अहवाल कृषि आयुक्तालयास सादर करणे बंधनकारक आहे. या अहवालानुसार शेतकऱ्यास कोणत्याही प्रकारच्या संसर्गजन्य रोगाची लागण झाली नसल्याचे तसेच सलग ७-१० दिवस कालावधीचा परदेश दौरा करण्यास शेतकरी शारिरीकदृष्ट्या पात्र असल्याचे डॉक्टरांनी प्रमाणित करणे आवश्यक राहील.

**अनुदानाचा तपशील-**

१. शासनाकडून अभ्यास दौऱ्याकरीता सर्व घटकातील (संवर्गातील) शेतकऱ्यांना एकूण खर्चाच्या ५०टक्के रक्कम किंवा जास्तीत जास्त रु. १.०० लाख (रुपये एक लाख फक्त) यापैकी कमी असेल ती रक्कम अनुदान म्हणून देय आहे.

२. योजनेचा लाभ घेण्यासाठी कृषि विभागामार्फत निवड झालेल्या शेतकऱ्यांना अभ्यास दौऱ्याच्या खर्चाचा संपूर्ण १०० टक्के हिस्सा प्रवासी कंपनीकडे आगाऊ भरणा करणे बंधनकारक आहे. सदरची रक्कम शेतकऱ्याने कॅशलेस पध्दतीने त्यांच्या आधार क्रमांकाशी निगडीत स्वत:च्या बँक खात्यातून एनईएफटी, आरटीजीएस, आयएमपीएस, धनाकर्ष किंवा धनादेशाद्वारे प्रवासी कंपनीस अदा करणे व त्याचा पुरावा कृषी आयुक्तालय कार्यालयास सादर करणे आवश्यक राहील.

३. दौऱ्याची तारीख निश्चित झाल्यानंतर कृषी विभागाशी संपर्क साधून दौऱ्यामध्ये निवड झाल्याचे कृषि विभागाकडून पत्र मिळाल्यानंतरच शेतकऱ्याने दौरा खर्चाची १०० टक्के रक्कम दौरा आयोजित करणाऱ्या कंपनीकडे भरणा करावी.

४. शेतकऱ्यांना देय असलेले ५० टक्के शासकीय अनुदान अभ्यास दौरा पूर्ण करुन परत आल्यानंतर व आवश्यक ती कागदपत्रे (प्रवासाचे विमान तिकीट, बोर्डींग पास, बँकेचा सविस्तर तपशील इ.) दौऱ्यासोबत असणाऱ्या अधिकाऱ्यांकडे जमा केल्यानंतरच सरळ शेतकऱ्यांच्या नावे बँक खात्यात डीबीटीद्वारे जमा करण्यात येईल.

५. शेतकऱ्याने त्याचे बँकेचे खाते आधार क्रमांकाशी जोडून घेणे आवश्यक .

६. मंजूर अभ्यास दौरा दराव्यतिरिक्त परकीय चलनामध्ये होणारी वाढ किंवा घट व यामुळे मंजूर केलेल्या प्रवासी कंपनीच्या स्वीकृत दरामधील फरक देण्यास शासनाने शासन पत्र क्र.शेअदौ-४२१२/प्र.क्र.१०१/३-अे, दिनांक २२/०२/२०१३ नुसार मंजूरी दिली आहे. ज्या महिन्यात दौरा आयोजित केला जाणार आहे, त्या महिन्यातील एक तारखेस भारतीय रिझर्व्ह बँकेचा विनिमय

दर विचारात घेऊन हा फरक प्रवासी कंपन्यांना दिला जाईल. या फरकाच्या रकमेच्या ५० टक्के अनुदान (अधिकतम अनुदान रुपये एक लाखाच्या अधिन राहून) शेतकऱ्यास देय आहे. अशा परिस्थितीत वर नमूद केलेल्या शेतकरी हिश्श्यापेक्षा अधिक रक्कम शेतकऱ्यांना द्यावी लागेल. त्यानुसार शेतकऱ्याला एकूण प्रवासाची रक्कम प्रवासी कंपनीकडे जमा करावी लागेल

७. प्रवास दौऱ्यामध्ये समाविष्ठ केलेल्या बाबीव्यतिरिक्त इतर बाबींवरील खर्च शेतकऱ्याला स्वखर्चाने करावा लागेल.

**शेतकऱ्यांनी पाळावयाच्या अटी/शर्ती -**

सदर योजनेअंतर्गत देशाबाहेरील अभ्यास दौऱ्यांमध्ये सहभागी होताना शेतकऱ्यास खालील अटी/शर्तीचे पालन करणे बंधनकारक आहे

१. शेतकऱ्याने दौऱ्यास जाण्यापूर्वी शासनाने ठरवून दिलेल्या देशामध्ये अभ्यास दौरा करण्याकरीता विहीत प्रपत्रातील अर्जात माहिती भरणे आवश्यक आहे.

२. शेतकऱ्याच्या दुर्वर्तनामुळे जसेकी दौऱ्यादरम्यान मद्य प्राशन करुन इतरांना त्रास होईल असे वागणे, दौऱ्याच्या निश्चित वेळेचे पालन न करणे, नियोजीत केलेल्या स्थळ/भेटी इत्यादी कार्यक्रमांना भेटी न देणे, परदेशातील सार्वजनिक ठिकाण व भेटींच्या ठिकाणांच्या नियमांचे पालन न करणे इ.वर्तन होणार नाही व असे वर्तन केल्याचे आढळल्यास परदेशामध्ये काही कायदेशीर कारवाई (यामध्ये व्हीसा रद्द होणे किंवा विदेश दौऱ्यास बंदी करणे) अथवा दंडात्मक कारवाई झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत शेतकऱ्याची राहील. दंड म्हणून होणारा सर्व खर्च शेतकऱ्याला स्वत:ला सोसावा लागणार आहे, तसे स्वयंघोषणापत्र(प्रपत्र-१) अर्जासोबत जोडावे. विदेश अभ्यास दौऱ्यादरम्यान धुम्रपान व मद्यपान करण्यास सक्त मनाई आहे. विदेश अभ्यास दौऱ्यादरम्यान वैयक्तीक वागणुकीमुळे कृषी विभाग किंवा देशाच्या प्रतिमेस कमीपणा येईल, असे कोणतेही वर्तन शेतकऱ्याने करू नये.

३. पुर्वानुभव लक्षात घेता काही शेतकरी मुक्कामाच्या ठिकाणाहून रात्री उशीरा बाहेर पडतात, असे करणे परकीय देशात धोकादायक होण्याची शक्यता नाकारता येत नाही. प्रामुख्याने भाषा, अनोळखी ठिकाण, तेथील नियम अटी, कायदे, सामाजिक सुरक्षा इ. बाबी विचारात घेता दौऱ्यादरम्यान मुक्कामाच्या ठिकाणी हॉटेलमध्ये वास्तव्यास गेल्यानंतर रात्रीच्यावेळी कोणत्याही परिस्थितीत सहभागी शेतकऱ्यास निवासाचा परिसर सोडता येणार नाही.

४. प्रवास कालावधीत शेतकऱ्यास विदेशामध्ये कोणत्याही वैद्यकीय कारणास्तव हॉस्पीटलमध्ये भरती करावे लागल्यास त्याच्या संपूर्ण खर्चाची जबाबदारी शेतकऱ्याची राहील. तसेच हॉस्पीटलमध्ये भरती न करता काही वैद्यकीय कारणास्तव खर्च झाल्यास त्या खर्चाचीसुध्दा जबाबदारी शेतकऱ्याची राहील. याबाबतचे स्वयंघोषणापत्र (प्रपत्र-१) शेतकऱ्याला द्यावे लागेल.

५. अभ्यास दौऱ्यासोबत गेलेल्या प्रत्येक शेतकऱ्याने अभ्यास दौऱ्यासोबतच परत यावयाचे आहे. कोणत्याही परिस्थितीत शेतकऱ्यास अभ्यास दौऱ्यांच्या मंजूर कालावधीनंतर परदेशात कोणत्याही कारणास्तव वास्तव्य करता येणार नाही. याबाबतचे स्वयंघोषणापत्र (प्रपत्र-१) शेतकऱ्याला द्यावे लागेल. जर एखाद्या शेतकऱ्याने या नियमांचे उल्लंघन केले तर त्याला कृषि विभाग/शासन जबाबदार राहणार नाही.परदेशातील नियमांनुसार योग्य ती कारवाई करण्याचे अधिकार संबंधीत देशाच्या प्रशासनास राहतील. त्याबाबत कृषि विभाग कोणत्याही प्रकारची जबाबदारी स्विकारणार नाही.तसे झाल्यास दौऱ्यासाठी कोणतेही शासकीय अनुदान शेतकर्यास मिळणार नाही.

६. सदर दौरा हा कृषि विभागाने निश्चित केलेल्या दौरा कार्यक्रमाप्रमाणे राहील. त्यामध्ये शेतकऱ्यांना स्वत: कोणत्याही वेगळया भेटींचा समावेश करता येणार नाही. नियोजीत कार्यक्रमाव्यतिरीक्त दौऱ्याचा गट सोडून इतरत्र भेटी देता येणार नाहीत.

७. शेतकऱ्याने दौरा पूर्ण झाल्यानंतर विहीत प्रपत्रात (प्रपत्र-४) द्यौऱ्याबाबतचे सविस्तर अभिप्राय देणे आवश्यक आहे. अभ्यास दौऱ्यावेळी आत्मसात केलेल्या ज्ञानाचा उपयोग आपल्या शेतावर/ परिसरामध्ये कशाप्रकारे करणार आहात, याबाबत विहीत प्रपत्रामध्ये माहिती भरुन देणे आवश्यक आहे.

८. सदर दौरा हा शेतकरी अभ्यास दौरा असल्याने प्रवासामधील ज्या ठिकाणांना भेटी द्यावयाच्या आहेत त्याची पूर्व कल्पना, परदेशामध्ये पाळावयाची बंधने, पूर्व तयारी, हवामानानुसार पेहराव, सोबत सामानांची वजन मर्यादा, इलेक्ट्रॉनिक वस्तू नेण्याबाबतची मान्यता, चलन उपलब्धता वगैरे माहिती शेतकऱ्यांना मराठीमध्ये लेखी स्वरुपात दौरा सुरु होण्याआधी पुरेशा कालावधीमध्ये संबंधित कंपनीकडून देण्यात येईल. त्यानुसार त्या सुचनांचे काटेकोर पालन करणे संबंधीत शेतकऱ्यास बंधनकारक राहील.

९. दौरा सुरु झाल्यानंतर परदेशातील आपले संपर्कासाठी असलेला भ्रमणध्वनी क्रमांक या कार्यालयास आणि दौरा सोबतचे अधिकारी यांना लेखी देणे बंधनकारक राहील. तसेच आपल्या कुटूंबातील जवळच्या दोन व्यक्तींचे संपर्क क्रमांकसुध्दा प्रवासी कंपनी तसेच कृषि आयुक्तालयास देणे आवश्यक आहे.

१०. दौरा निघण्यापुर्वी अथवा दौरा कालावधीत शासनाने कोणतेही नवीन नियम/अटी लागू केल्यास त्या पाळणे शेतकऱ्यांवर बंधनकारक राहील.

११. या योजनेध्ये सहभागी होऊ इच्छिणाऱ्या शेतकऱ्यांना वरील अटी व शर्तींची जाणीव जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी/तालुका कृषि अधिकारी/मंडळ कृषि अधिकारी यांनी करुन द्यावी. विहीत नमुन्यातील अर्ज व आवश्यक सर्व प्रपत्रासह माहिती सादर करावी.

१२. दौऱ्याच्या भेटीच्या ठिकाणांचा तपशील दौरा निघण्यापुर्वीच शेतकऱ्यांना देण्यात येत असल्यामुळे त्या त्या ठिकाणांची माहिती इंटरनेटच्या माध्यमातून शेतकऱ्यांनी स्वत:जवळ संकलीत करुन घ्यावी.

१३. शेतकऱ्याने त्याची मूळ प्रमाणपत्रे/कागदपत्रांच्या साक्षांकित प्रतीऐवजी स्वयंसाक्षांकित प्रती अर्जासोबत देण्याची मुभा सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय क्र.प्रसुधा-१६१४/३४५/प्र.क्र.७१/१८-अ, दिनांक ०९/३/२०१५ नुसार शेतकऱ्यास देण्यात येत असून अशा स्वयंसाक्षांकित प्रती शेतकऱ्यांकडून स्विकारण्यात. मात्र शेतकऱ्याने दिलेल्या स्वयंसाक्षांकित प्रतींच्या सत्यतेबाबत प्रपत्र-२ नुसार स्वयंसाक्षांकनासाठी स्वयंघोषणापत्र शेतकऱ्याने देणे बंधनकारक आहे.

१४. वरील दोन्ही स्वघोषणापत्रे (प्रपत्र- १ व २) साध्या कागदावर करता येतील. त्याकरीता न्यायिक कागदाची (कोर्ट स्टॅम्प पेपर) आवश्यकता नाही.

१५. वरील दोन्ही स्वघोषणापत्रावर संबंधीत शेतकऱ्याचे सुस्पष्ट असे मागील ६ महिन्यांच्या काळातील छायाचित्र (फोटो) असावे. त्यावर संबंधीत शेतकऱ्याची स्वाक्षरी असावी व आधार क्रमांकदेखील नमूद करावा.

**शेतकरी निवडीची कार्यपध्दती -**

राज्यातील शेतकऱ्यांचे देशाबाहेरील अभ्यास दौरे या योजनेअंतर्गत शेतकऱ्याने सोबत सहपत्रित केलेल्या प्रपत्र-९ वरील अर्जाप्रमाणे माहिती भरुन संबंधीत तालुका कृषि अधिकारी यांच्याकडे प्रस्ताव सादर करावेत.

- तालुका कृषि अधिकारी यांनी प्रपत्र-६ मध्ये निश्चित केलेल्या कालावधीपर्यंतच प्रस्ताव स्विकारावेत. प्राप्त झालेल्या प्रस्तावांची तपासणी व छानणी करुन जे शेतकरी निवडीचे निकष पूर्ण करत आहेत अशा प्रस्तावांनाच प्रपत्र-७ नुसार प्रमाणीत करावे. अशा पात्र शेतकऱ्यांचे प्रस्ताव जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांच्याकडे विहीत कालावधीत (प्रपत्र-६) पाठवावेत.
- जिल्हा स्तरावर खालील समितीचे गठन करण्यात येत असून समितीने पुढीलप्रमाणे कार्यवाही करावी.

**जिल्हास्तरीय समिती -**

विभागीय कृषि सहसंचालक यांच्याकडे शिफारस करण्यासाठी पुढीलप्रमाणे जिल्हास्तरीय समितीचे गठन करण्यात येत आहे.

१. जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी - अध्यक्ष
२. प्रकल्प संचालक, आत्मा - सदस्य
३. जिल्हा कार्यक्षेत्रातील एक उपविभागीय कृषि अधिकारी - सदस्य
४. जिअकृअ कार्यालयातील कृषि उपसंचालक - सदस्य सचिव

**जिल्हास्तरीय समितीची कार्यकक्षा -**

१. तालुका स्तरावरुन पात्र शेतकऱ्यांचे प्रस्ताव जिल्हास्तरावर विहीत कालावधीमध्ये (प्रपत्र-६) प्राप्त झाल्यानंतर समितीने मार्गदर्शक सूचनांमधील अटी/शर्तीनुसार प्रस्तावांची तपासणी/छाननी करावी. समितीने प्रपत्र-७ प्रतिस्वाक्षरीत करावे व जे प्रस्ताव पात्र आहेत अशा पात्र ठरविलेल्या प्रस्तावांची सोडत पध्दतीने सोडत काढून जिल्ह्यातील शेतकऱ्यांची जेष्ठता क्रमवारी निश्चित करावी.
२. सोडत पध्दत ही जिल्हास्तरीय समितीसमोर घेण्यात यावी व सोडतीचा दिनांक, वेळ, ठिकाण इ. ची माहिती स्थानिक वृत्तपत्रामधून प्रसिध्द करावी.
३. सोडतीकरीता उपस्थित असलेल्या शेतकरी बांधवांना सोडत काढणेपुर्वी सोडत प्रक्रियेची थोडक्यात सविस्तर माहिती द्यावी.
४. सोडत ही पूर्ण पारदर्शक होण्यासाठी याचे चलचित्रीकरण (व्हीडीओग्राफी) करुन संग्रही ठेवावे.
५. सोडत प्रक्रियेचे इतिवृत्त तयार करुन त्यामध्ये सर्व अवलंबिलेल्या प्रक्रियेचा उल्लेख करावा.
६. सोडत प्रक्रिया राबवून तयार केलेली जेष्ठता क्रमवारी यादी कार्यालयाबाहेर दर्शनी भागात प्रसिध्द करावी.
७. अभ्यास दौऱ्याच्या निवडीकरीता जिल्हास्तरावर सोडत काढून जेष्ठता क्रमवारी निश्चित केलेल्या शेतकऱ्यांच्या प्रस्तावासह यादी व समितीच्या इतिवृत्तासह संबंधीत विभागीय कृषि सहसंचालक यांना सादर करावी. जिल्हास्तरावर शेतकऱ्यांच्या जेष्ठता क्रमवारीसह यादी करताना ती मराठी व इंग्रजीमध्ये तयार करुन सादर करावी. त्याचा नमूना प्रपत्र-८ प्रमाणे देण्यात येत आहे.
८. जिल्हानिहाय लक्ष प्रपत्र-१० नुसार देण्यात येईल. जिल्ह्यांनी या लक्ष्यानुसारच प्रस्ताव आपल्या संबंधीत विभागास सादर करावेत. एखाद्या जिल्ह्याकडे दिलेल्या लक्ष्यापेक्षा अधिक प्रस्ताव प्राप्त झाल्यास या सर्व प्रस्तावांची सोडत काढून त्यांना जेष्ठता क्रमवारी द्यावी. जेष्ठता क्रमवारीतील उर्वरीत प्रस्ताव आर्थिक वर्ष संपेपर्यंत जिल्हास्तरावर जतन करावेत. चालू वर्षी दिलेल्या लक्ष्याव्यतिरिक्त जादाच्या प्रस्तावांची आवश्यकता भासल्यास त्यापुढील क्रमावारीनुसार प्रस्ताव विभागामार्फत आयुक्तालयास सादर करावेत.
९. विभागीय कृषि सहसंचालक यांनी जिल्ह्यांकडून जेष्ठता क्रमावारीसह प्राप्त झालेल्या शेतकऱ्यांचे प्रस्ताव तपासून दिलेल्या अटी व शर्तीमध्ये सदर शेतकरी पात्र होत असल्याबाबत शिफारस करुन जिल्हानिहाय परिपूर्ण प्रस्ताव आयुक्तालयास विहीत कालावधीमध्ये (प्रपत्र-६) सादर करावेत.

राज्यातील सर्व विभागीय कृषी सहसंचालकांमार्फत आयुक्तालय स्तरावर प्राप्त झालेले शेतकऱ्यांचे प्रस्ताव आर्थिक वर्ष संपेपर्यंत वैध राहतील व यानंतर आपोआप रद्द होतील. चालू आर्थिक वर्षामध्ये अभ्यास दौऱ्याकरीता ज्या शेतकऱ्याची निवड झाली नसेल अशा शेतकऱ्यास पुढील आर्थिक वर्षात पुन्हा नव्याने अर्ज करणे आवश्यक आहे.

**राज्यस्तरीय समिती -**

जिल्हा स्तरावरील समितीने शिफारस केलेल्या शेतकऱ्यांच्या अर्जांची तपासणी केल्यानंतर शेतकऱ्यांना विदेश दौऱ्यावर पाठविण्याचा अंतिम निर्णय आयुक्त, कृषि यांच्या अध्यक्षतेखालील राज्यस्तरीय समिती घेईल. सदर समितीची बैठक तीन महिन्यातून किमान एकवेळा किंवा आवश्यकतेनुसार करावी. समितीची रचना पुढीलप्रमाणे-

| | | |
|---|---|---|
| १. | आयुक्त (कृषि) | - अध्यक्ष |
| २. | कृषि संचालक (विस्तार व प्रशिक्षण) | - सदस्य |
| ३. | कृषि संचालक (मृद संधारण) | - सदस्य |
| ४. | कृषि संचालक (निविष्ठा व गुणनियंत्रण) | - सदस्य |
| ५. | कृषि संचालक (फलोत्पादन) | - सदस्य |
| ६. | कृषि संचालक (कृषि प्रक्रिया व नियोजन) | - सदस्य |
| ७. | कृषि संचालक (आत्मा) | - सदस्य |
| ८. | कृषि सहसंचालक (वि.प्र.२) | - सदस्य |
| ९. | कृषी उपसंचालक (शेतकरी मासिक) | - सदस्य सचिव |

**राज्यस्तरीय समितीची कार्यकक्षा -**

१. राज्यातील सर्व प्रादेशिक कृषि संभागांमार्फत प्राप्त झालेल्या प्रस्तावांची अटी व शर्ती नुसार छाननी करून अंतिम शेतकरी यादी शासनाकडे मंजुरीसाठी सादर करणे. .
२. प्रत्येक अभ्यास दौऱ्यासाठी ४० ते ५० शेतकऱ्यांची निवड करून प्रवासी कंपनीस अंतिम यादी पाठवावी
३. परदेशातील कृषि हवामान परिस्थितीचे वेळापत्रक आणि योजनेतील विविध स्तरावरील निर्णयांचे वेळापत्रक यांचा ताळमेळ राखून दौरा कार्यक्रमाचे व्यवस्थापन यशस्वीपणे पार पाडावे.
४. समितीने प्रत्येक अभ्यास दौऱ्यासोबत पाठवावयाच्या दोन अधिकाऱ्यांची निवड करून शासनास शिफारस करावी.

**दौऱ्यासोबत जाणाऱ्या अधिकारी निवडीचे निकष –**

१. वैध पारपत्र (पासपोर्ट) धारक असावा.
२. शासकीय सेवेत किमान तीन वर्ष राजपत्रीत पदावर काम केल्याचा अनुभव असावा. तसेच दौऱ्यास निवड होतेवेळी किमान एक वर्ष सेवा शिल्लक असणे आवश्यक आहे.
३. निवड केलेल्या अधिकाऱ्याची कोणतीही विभागीय चौकशी सुरु नसल्याचे अधिकाऱ्याने स्वसाक्षांकित करावे व तशी खात्री कार्यालय प्रमुखांनी करुन प्रमाणित करावे.
४. यापुर्वी शासकीय खर्चाने या योजनेंतर्गत परदेश अभ्यास दौरा केला नसल्याचे स्वसाक्षांकित करावे व त्यास कार्यालय प्रमुखाने प्रमाणित करावे.
५. शासकीय सेवेमध्ये नाविन्यपूर्ण उपक्रम, स्थानिक कृषि विषयक प्रश्न सोडविण्यासाठी पुढाकार/उपक्रम राबविणाऱ्या अधिकाऱ्यांना प्राधान्य देण्यात यावे.
६. प्रपत्र-३ मध्ये वैयक्तीक माहितीच्या नमुन्यातील विविध बाबींची पूर्तता करण्यात यावी.
७. अधिकाऱ्यांना परदेशामध्ये जाण्याच्या मर्यादीत संधी विचारात घेऊन यापुर्वी शासकीय खर्चाने प्रवास न केलेल्या अधिकाऱ्यांचाच दौऱ्यासाठी विचार करावा.

**दौऱ्यासोबत जाणाऱ्या अधिकाऱ्यांची जबाबदारी -**

अभ्यास दौऱ्यासोबत ज्या अधिकाऱ्याची निवड करण्यात येते अशा अधिकाऱ्यांवर शासनाचे प्रतिनिधीत्व तसेच दौरा कार्यक्रमाचे नियंत्रण करण्याची जबाबदारी देण्यात येत आहे. अशा अधिकाऱ्यांनी दौऱ्याच्या गटाचे नेतृत्व करुन दौरा पूर्ण होईपर्यंत दौऱ्याचे संपूर्ण व्यवस्थापन व समन्वय राखणे आवश्यक आहे. तसेच प्रवासी कंपनीच्या दौरा व्यवस्थापकाच्या सहकार्याने तांत्रिक स्थळभेटीच्यावेळी गटाला आवश्यक ती माहिती देण्याची तसेच दौरा यशस्वीरित्या पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधीत अधिकाऱ्यांची

राहील. दौरा पूर्ण झाल्यानंतर निवडलेल्या अधिकाऱ्यांनी तांत्रिक भेटींच्या फोटो व माहितीसह संपूर्ण अहवाल एका आठवड्याच्या आत सॉफ्ट व हार्ड कॉपीसह सादर करणे आवश्यक आहे. अधिकाऱ्यांना राज्यातील कृषि विषयक विस्तृत माहिती असावी. निवड झालेल्या अधिकाऱ्यांनी ज्या देशात भेटी द्यावयाच्या आहेत तेथिल कृषि हवामान, भौगोलिक, राजकीय व ऐतिहासिक माहिती इंटरनेटव्दारे उपलब्ध करुन द्यावी.

दौऱ्यादरम्यान कोणत्याही प्रकारचे वाद अथवा कारवाई संदर्भात घटना घडल्यास किंवा शेतकरी आजारी पडल्यास दौऱ्यासाठी निवडलेल्या शासकीय अधिकाऱ्यांनी समन्वय व प्रसंगावधान राखून सदर प्रश्न निकाली काढावा व याबाबत कृषि आयुक्तालयास त्वरीत अवगत करावे. तसेच संबंधित शेतकऱ्यासोबत दौरा अधिकारी यांनी स्वतःथांबणे आवश्यक आहे.

दौऱ्यामध्ये सहभागी झालेल्या अधिकाऱ्यांनी दौरा पूर्ण झाल्यानंतर शेतकऱ्यांकडून विहीत प्रपत्रामध्ये त्यांचे अभिप्राय तसेच दौऱ्यानंतर आपल्या शेतीमध्ये आणि परिसरातील शेतीमध्ये करावयाचे प्रयोग/बदल याबाबतचा आराखडा प्राप्त करावा व जिल्हानिहाय त्याचे संकलन करुन कृषि आयुक्तालयाकडे प्रत सादर करावी. त्याचप्रमाणे अभिप्रायामध्ये नमूद केल्यानुसार शेतकऱ्याला नवीन प्रयोग करण्यासाठी मार्गदर्शन करण्यात यावे व त्याचा पाठपुरावा करुन अभिप्रायासह निष्कर्ष कृषी आयुक्तालयास सादर करावे.

**प्रवासी कंपन्यांची जबाबदारी -**

१. शेतकऱ्यांचे देशाबाहेरील अभ्यास दौरे आयोजित करण्यासाठी ई-निविदा पध्दतीचा अवलंब करुन आयुक्तालय स्तरावर प्रवासी कंपन्यांची निवड करण्यात येईल.
२. निवड झालेल्या दौरा कंपनीने कृषि विभागासोबत रु.५००/- च्या स्टॅम्प पेपरवर नोंदणीकृत करारनामा करणे बंधनकारक आहे. प्रत्येक दौऱ्यासाठी देशामधील भेटींच्या स्थळांचा कार्यक्रम निश्चित करण्यात येईल. सदर ठिकाणांची निश्चिती करताना प्रवासी कंपन्यांच्या प्रतिनिधींनी त्या देशातील कृषि विषयक तज्ञांकडून माहिती सादर करावी. त्यावर कृषि विभागाने तपासणी करुन दिवसनिहाय कार्यक्रमाची आखणी करावी. सदर स्थळभेटीच्या तपशीलास राज्यस्तरीय समितीमार्फत अंतिम मान्यता देऊन दौरा कार्यक्रम निश्चित करण्यात येईल.
३. निवड झालेल्या प्रवासी कंपनीला कृषि विभागाने शेतकरी निवड व त्यांच्याकडून घ्यावयाच्या बुकींगबाबत वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे पालन करणे बंधनकारक राहील.
४. निविदा प्रक्रियेमध्ये अंतिम निवड झालेल्या प्रवासी कंपनीने निविदा सुचनेनुसार दौऱ्याचा तपशील जोडणे आवश्यक आहे. आवश्यकतेनुसार बदल सुचवायचा झाल्यास त्याची मान्यता घेणे बंधनकारक राहील. दौरा कार्यक्रम निश्चित झाल्यानंतर शेतकऱ्यांच्या विहीत कागदपत्रांची पूर्तता करण्याची जबाबदारी प्रवासी कंपनीची राहील.
५. राज्यस्तरीय समितीने मान्यता दिलेल्या शेतकऱ्यांच्या निवड यादीमधून एका दौरा कार्यक्रमासाठी आवश्यकतेनुसार शेतकऱ्यांची निवड केलेल्या नावांची यादी कंपनीकडे पाठविण्यात येईल. कंपनीने आवश्यकता असल्यास अधिकच्या नावांच्या यादीची मागणी आयुक्तालयाकडे करावी. निवड केलेल्या शेतकऱ्यांकडून आवश्यक ती कागदपत्रे कंपनीने जमा करावी.
६. कृषि विभागाकडून अभ्यास दौऱ्याकरीता निवड केलेल्या शेतकऱ्यांना नियोजित स्थळ-भेटी कार्यक्रमाचा तपशील, विमान प्रवासाबाबतचा तपशील, निवास व भोजन व्यवस्थेबाबतचा तपशील, पुणे येथून विमानतळापर्यंत असणाऱ्या प्रवास सुविधेचा तपशील, कृषि विभागाच्या लेखी मान्यतेचे पत्र, यापुर्वी शासकीय अनुदानाने देशाबाहेर दौरा केला नसल्याबाबतचे प्रमाणपत्र इ.बाबींची पूर्तता केल्यानंतर शेतकऱ्याकडून अभ्यास दौरा खर्चाची १०० टक्के रक्कम घेण्यात यावी.
७. एका अभ्यास दौऱ्यामध्ये जास्तीत जास्त ४० ते ५० शेतकऱ्यांचा गट तयार करुन, शेतकऱ्यांची यादी व व्हिसा कार्यालयास पाठवावयाचे पत्र आयुक्तालयास सादर करावे. कोणत्याही दौऱ्यास शेतकऱ्याचे नाव प्रस्तावीत करताना त्याने यापुर्वी देशाबाहेरील अभ्यास दौऱ्यासाठी कोणत्याही शासकीय योजनेचा लाभ घेतला नसल्याची खात्री करुनच शेतकऱ्यांची निवड यादी व्हीसा

प्रक्रियेसाठी सादर करावी. यादी व्यतिरिक्त कोणत्याही कारणांकरीता अधिकच्या नावांची व्हीसा मंजूरीसाठी शिफारस करु नये व या यादी व्यतिरिक्त कोणतीही जादाची व्यक्ती गटासोबत दौऱ्यास घेऊन जाऊ नये.

८. दौऱ्याचा सविस्तर तपशील, निवास भोजनाचा तपशील, शेतकऱ्यांची प्रमाणीत यादी, पारपत्र व व्हीसाच्या प्रतींसह एक प्रत कृषि आयुक्तालयास सादर करावी.

९. प्रत्येक अभ्यास दौऱ्याकरीता अनुभवी दौरा व्यवस्थापक असावा. परदेशी भाषा, विशेषत: इंग्रजी भाषेवर प्रभुत्व असलेला, ज्या देशांमध्ये दौरा आयोजित करावयाचा त्या देशातील ऐतिहासीक, भौगोलीक, राजकीय, वैज्ञानिक बाबींची उत्तम माहिती असलेला, कार्यतत्पर, सहकार्याची भावना असणारा असावा. अशा निश्चित केलेल्या दौरा व्यवस्थापकाचे नाव व संपर्क क्रमांक शेतकऱ्यांकडून बुकींगची रक्कम स्विकारतानाच देण्यात यावे.

१०. पुणे येथून विमानतळापर्यंत तसेच परदेशात पोहोचल्यानंतर तेथील स्थानिक स्थळ-भेटीच्या प्रवासाकरीता सुस्थितीतील वातानुकूलीत बसची सुविधा उपलब्ध करणे, देशात परतल्यानंतर विमानतळापासून वातानुकूलीत बसनेच पुन्हा पुणे पर्यंत शेतकऱ्यांना आणुन सोडणे कंपनीची जबाबदारी राहील.

११. देशाबाहेरील अभ्यास दौऱ्यादरम्यान त्या त्या देशांमध्ये असलेले हवामानानुसार योग्य ते पोषाख, चलन, दूरध्वनी सेवा, वाहतूक नियम, बंधने, विविध अद्ययावत सोई सुविधांचा वापर करण्यासाठी सूचना इ. बाबत किमान एक आठवडापुर्व दौऱ्यास निवडलेल्या सर्व शेतकऱ्यांना स्लाईड शो च्या माध्यमातून अवगत करावे.

१२. कृषि विभागाकडून अभ्यास दौऱ्यास निवड झालेल्या शेतकऱ्याचा वैद्यकीय तपासणी अहवाल प्राप्त झाल्यानंतरच दौऱ्यादरम्यानचा वैयक्तीक विमा उतरवून घेण्याची जबाबदारी संबंधीत प्रवासी कंपनीची राहील व यासाठी आवश्यक ते शुल्क शेतकऱ्याकडून घेण्यात यावेत.

१३. अभ्यास दौऱ्यादरम्यान निवड झालेल्या सर्व शेतकऱ्यांना परदेशात सुखरुप घेऊन जाणे व सुखरुप घेऊन येणे ही प्रवासी कंपनीची जबाबदारी राहील. तसेच विदेशात शेतकऱ्याच्याबाबतीत काही वैद्यकीय प्रकरण उद्भवल्यास त्यास संपूर्ण सहकार्य करणे प्रवासी बंधनकारक राहील.

१४. अभ्यास दौरा दुय्यम दर्जाचा होईल अशी कोणतीही कार्यवाही होणार नाही याची जबाबदारी प्रवासी कंपनीची राहील.

१५. देशातील स्थानिक भेटीच्या संस्थेचे दूरध्वनी क्रमांक प्रवासी कंपनीच्या दौरा व्यवस्थापकाकडे असणे आवश्यक आहे. ही माहिती दौऱ्यासोबत असणाऱ्या अधिकाऱ्यांनासुध्दा देणे बंधनकारक राहील.

१६. शेतकऱ्यांनी कंपनीबाबत दौरा व्यवस्थापनाकरीता दिलेल्या प्रतिक्रियांपैकी ५० टक्के पेक्षा जास्त प्रतिक्रिया वाईट स्वरुपाच्या असल्यास कंपनीला पुढील कालावधीत अपात्र ठरवण्यात येईल.

१७. कृषि विभागाशी झालेल्या करारातील प्रवास, निवास, भोजन, भेटीबाबत ठरलेल्या अटी/शर्तींचे उल्लंघन केल्यास कंपनीला काळ्या यादीत टाकण्यात येईल.

१८. अभ्यास दौऱ्यातील सर्व शेतकरी/अधिकारी यांना ओळखीची खुण म्हणुन बॅचेस/कॅप/ट्रॅव्हल बॅग/इतर कोणतीही वस्तु देण्यात यावी. जेणेकरुन विविध भेटी दरम्यान गटातील शेतकऱ्यांना ओळखता येईल.

सोबत: विहीत प्रपत्रे.

**कृषि संचालक (विस्तार व प्रशिक्षण)**
**कृषि आयुक्तालय,म.रा.पुणे**

शेतक-याचा फोटो

**प्रपत्र-१**

**स्वयंघोषणापत्र**

मी ------------------------------------------------------------- वय ------ वर्षे, आधार क्रमांक ---------------------------------
व्यवसाय --------------------- रा. ----------------------------------------------------------------------------------- येथील रहिवासी असून कृषि विभागामार्फत आयोजित केल्या जाणा-या शेतक-यांच्या देशाबाहेरील अभ्यास दौ-याकरीता खालीलप्रमाणे स्वखूशीने लिहून देत आहे.

मी लिहून देतो/देते की, सदर दौ-यादरम्यान माझ्या वैयक्तीक वागणुकीमुळे माझ्या किंवा माझ्या देशाच्या अभिमानास तडा जाईल असे कोणतेही वर्तन करणार नाही. दौ-यादरम्यान दुर्वर्तन (यामध्ये मद्य प्राशन करुन इतरांना त्रास होईल असे वागणे, दौ-याच्या निश्‍चित वेळेचे पालन न करणे, नियोजीत केलेल्या स्थळ/भेटी इत्यादी कार्यक्रमांना प्राधान्य न देणे, परदेशातील सार्वजनिक ठिकाण व भेटींच्या ठिकाणांच्या नियमांचे पालन न करणे इ.) केल्याचे आढळल्यास कृषि विभागामार्फत आकारण्यात येणा-या संबंधीत देशाच्या चलनाएवढी रक्कम दंड म्हणून वसूल करण्यास माझी सहमती आहे.

तसेच माझ्या दुर्वर्तनामुळे परदेशातील एखाद्या देशामार्फत माझ्यावर काही शासकीय कारवाई (यामध्ये व्हीसा रद्द होणे किंवा माझ्या वैयक्तीक विदेश दौ-यास बंदी करणे) अथवा दंडात्मक कारवाई झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी माझी राहील. दंड म्हणून होणारा सर्व खर्च मला स्वतःला सोसावा लागणार आहे,याची मला जाणीव आहे.त्यामुळे प्रवासाला जाण्यापूर्वी मी विहित मुदतीत पूर्ण रक्कम प्रवासी कंपनीस जमा करण्यास तयार आहेमाझ्या गैरवर्त .णूकीमुळे काही दंडात्मक रक्कम शासनास भरणा करावी लागल्यास मला देय असलेल्या अनुदानातून ती रक्कम वजा करण्यास माझी हरकत नाही.

मी लिहून देतो/देते की, प्रवास कालावधीत कोणत्याही स्वरुपाचा अपघात किंवा दुखापत झाल्यास त्याची जबाबदारी कृषि विभागाची राहणार नाही. ती माझी जबाबदारी राहील. तसेच मला विदेशामध्ये कोणत्याही वैद्यकीय कारणामुळे हॉस्पीटलमध्ये ॲडमीट करावे लागल्यास त्याच्या संपूर्ण खर्चाची जबाबदारी माझी राहील. तसेच ॲडमीट न करता काही वैद्यकीय खर्च झाल्यास त्या खर्चाचीसुध्दा जबाबदारी माझीच राहील. याबाबत शासनाकडून आर्थिक मदत मिळणार नाही, याची मला जाणीव आहे. अशा कोणत्याही घटनेच्यावेळी दौ-यातील इतर सहका-यांचा भेटीचा कार्यक्रम न चुकता नियमीत चालू राहील याकरीता आवश्यक ते निर्णय घेऊन मी वैयक्तीकरित्या/माझ्या कटूंबियांच्या मदतीने आवश्यक ती कार्यवाही करेन.

मी लिहून देतो/देते की, मी अभ्यास दौ-याच्या मंजूर कालावधीनुसार संबधीत गटासोबत पुन्हा भारतात परत येईन. अन्यथा नियमानुसार कायदेशीर कारवाईस पात्र राहीन. दौरा कार्यक्रमाव्यतरिक्त इतर कोणत्याही भेटींच्या बाबत मी आग्रह धरणार नाही व विभागाने निश्‍चित केलेला कार्यक्रम यशस्वीपणे राबविण्यासाठी सर्व ठिकाणी आवश्यकतेनुसार सहभागी होईन.मार्गदर्शक सूचनेनुसार संपूर्ण सूचना मी वाचल्या असून त्या सूचना बरहुकूम काटेकोर अंमलबजावनी करण्याची जबाबदारी माझी राहील याची मी हमी देत आहे .

मी सत्यप्रतिज्ञेवर लिहून देतो/देते की,

१. मी यापुर्वी कोणत्याही शासकीय योजनेच्या अर्थसहाय्याने विदेश दौरा केलेला नाही.

२. मी स्वतः शेतकरी असून माझे उत्पन्नाचे स्त्रोत व माझी उपजिवीका शेतीवरच अवलंबून आहे.

३. मी कोणत्याही शासकीय, निमशासकीय, सहकारी, खाजगी सेवेत नाही. तसेच वैद्यकीय क्षेत्रातील डॉक्टर, वकील, सीए (चार्टड अकाउंटंट), अभियंता, कंत्राटदार इ. व्यावसायिक नाही.

मी याद्वारे घोषीत करतो / करते की, वरील सर्व माहिती माझ्या व्यक्तीगत माहिती व समजुतीप्रमाणे खरी आहे. सदर माहिती खोटी आढळून आल्यास भारतीय दंड संहिताअन्वये किंवा संबंधीत कायद्यानुसार माझ्यावर खटला भरला जाईल व त्यानुसार मी शिक्षेस पात्र राहीन, याची मला पूर्ण जाणीव आहे तसेच विहित मुदतीत प्रवासी कंपनीकडे प्रवास खर्चाची पूर्ण रक्कम भरणा करेन व विहित वेळेत मी रक्कम भरणा न केल्यास माझी निवड रद्द होईल याची मला पूर्ण जाणीव असून याबाबत माझी काहीही तक्रार असणार नाही.

ठिकाण : (शेतक-याची सही)

दिनांक- / /२० (नाव -------------------------------------------------)

**(सदरचे घोषणापत्र तालुका कृषि अधिकारी यांनी प्रमाणीत करावे)**

वरील शेतक-याने स्वयंघोषणापत्रात नमूद केलेली सर्व माहिती बरोबर असल्याची खात्री केली आहे.

ठिकाण : तालुका कृषि अधिकारी, -----------------

दिनांक- / /२० ता.------------- जि.------------

**<u>प्रपत्र-२</u>**

**स्वयंसाक्षांकनासाठी स्वयंघोषणापत्र**

शेतक-याचा
फोटो

मी ------------------------------------------------------------ वय ------ वर्षे, आधार क्रमांक --------------------------- व्यवसाय -------------------------------- रा.----------------------------------------------------------------------- याद्वारे घोषीत करतो / करते की, मी स्वयंसाक्षांकित केलेल्या प्रती या मूळ कागदपत्रांच्याच सत्यप्रती आहेत. त्या खोट्या असल्याचे आढळून आल्यास भारतीय दंड संहिताअन्वये किंवा संबंधीत कायद्यानुसार माझ्यावर खटला भरला जाईल व त्यानुसार मी शिक्षेस पात्र राहीन, याची मला पूर्ण जाणीव असून याबाबत माझी काहीही तक्रार असणार नाही.

ठिकाण : (शेतक-याची सही)
दिनांक- / /२० (नाव ---------------------------------------------------------)

**(सदरचे घोषणापत्र तालुका कृषि अधिकारी यांनी कागदपत्रांच्या सत्यप्रती पडताळून योग्य असल्यास प्रतीस्वाक्षरीत करावे.)**

ठिकाण : तालुका कृषि अधिकारी, ------------------
दिनांक- / /२० ता.-------------- जि.--------------

**प्रपत्र-३**

**राज्यातील शेतक-यांचे देशाबाहेर अभ्यास दौरे या योजनेअंतर्गत अभ्यास दौ-यास जाऊ इच्छिणा-या अधिका-यांनी भरुन द्यावयाचे प्रपत्र**

| अ. क्र. | नाव व पत्ता दूरध्वनी क्रमांक (निवास) | सध्याचे पदनाम, कार्यालय संपर्क क्रमांक (कार्यालय) मोबाईल क्रमांक, ईमेल | सध्याच्या पदाची वेतनश्रेणी | विवाहीत/ अविवाहीत | स्त्री/ पुरुष | शैक्षणीक आर्हता व जन्म दिनांक | पारपत्र क्रमांक व वैध कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| | | | | | | | |

| रुजु दिनांकापासून आतापर्यंत काम केलेली पदे व तपशील | | विभागीय चौकशी यापुर्वी झाली काय, सुरु आहे काय, प्रस्तावीत आहे काय? | आतापर्यंत राज्य/ राष्ट्रीय पातळीवर घेतलेले प्रशिक्षण | यापुर्वी परदेश दौरा/प्रशिक्षण शासकीय खर्चाने केले आहे काय? | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| पद | कालावधी | | | देश | विषय | कालावधी | कोणत्या योजनेअंतर्गत |
| ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ |
| | | | | | | | |

| मत्ता व दायित्व दाखला सादर केल्याचा दिनांक | सेवानिवृत्तीचा दिनांक | शेरा |
|---|---|---|
| १७ | १८ | १९ |
| | | |

**अधिका-याची स्वाक्षरी**

**पदनाम:**

**कार्यालयाचा पूर्ण पत्ता:**

**(जिल्हा / विभाग प्रमुख / नियंत्रण अधिकारी यांनी प्रतीस्वाक्षरीत करावे)**

**प्रपत्र-४**

**राज्यातील शेतक-यांचे देशाबाहेर अभ्यास दौरे**
**अभ्यास दौ-याबाबत शेतक-यांचे अभिप्राय**

| | | |
|---|---|---|
| १ | शेतक-याचे पुर्ण नाव व पत्ता, दूरध्वनी क्रमांक, ईमेल, भ्रमणध्वनी क्रमांक | |
| २ | अभ्यास दौरा केलेल्या देशाचे नाव | |
| ३ | प्रवासी कंपनीचे नाव | |
| ४ | शेतक-यांचा अभ्यास दौरा करण्यामागील उद्देश | |
| ५ | प्रवासाचा कालावधी | |
| ६ | विमान सेवेचा दर्जा | (१) अतिउत्कृष्ट (२) उत्कृष्ट (३) सर्वसाधारण (४) असमाधानकारक |
| ७ | अभ्यास दौ-यावेळी प्रवासी कंपनीकडून निवासस्थानाची करण्यात आलेली व्यवस्था. | (१) अति उत्कृष्ट (२) उत्कृष्ट (३) सर्वसाधारण (४) असमाधानकारक |
| ८ | हॉटेलचा दर्जा | १) २-स्टार २) ३-स्टार ३) ४-स्टार ४) इतर |
| ९ | चहा, नाश्ता, दुपार व सायंकाळच्या जेवणाची सोय उत्तम होती काय? | (१) अतिउत्कृष्ट (२) उत्कृष्ट (३) सर्वसाधारण (४) असमाधानकारक |
| १० | अभ्यास दौ-यात कृषि विषयक स्थळे इत्यार्दीना भेटीचे केलेले नियोजन. | (१) अतिउत्कृष्ट (२) उत्कृष्ट (३) सर्वसाधारण (४) असमाधानकारक |
| ११ | संबंधीत देशात कृषि विषयक स्थळ दर्शनासाठी कंपनीकडून करण्यात आलेली बस व्यवस्था कशी होती? | (१) अतिउत्कृष्ट (२) उत्कृष्ट (३) सर्वसाधारण (४) असमाधानकारक |
| १२ | प्रवाससोबत प्रवासी कंपनीचे व्दिभाषी/ कृषि विषयक मार्गदर्शकांचे सहकार्य. | (१) अतिउत्कृष्ट (२) उत्कृष्ट (३) सर्वसाधारण (४) असमाधानकारक |
| १३ | प्रवाससोबत असलेल्या कृषि विभागाच्या अधिका-यांनी कृषि विषयक केलेले मार्गदर्शन. | (१) अतिउत्कृष्ट (२) उत्कृष्ट (३) सर्वसाधारण (४) असमाधानकारक |

| | | |
|---|---|---|
| १४ | एकंदरीत अभ्यास दौ-याकरीता शासनाकडून करण्यात आलेल्या सोयी सुविधांबाबत स्वंयस्पष्ट अभिप्राय. | |
| १५ | अभ्यास दौ-यादरम्यानिमीत्त मिळालेले कृषि विषयक ज्ञान याबाबत थोडक्यात माहिती द्यावी. | |
| १६ | अभ्यास दौ-याच्यावेळी आत्मसात केलेल्या ज्ञानाचा उपयोग आपल्या शेतावर आणि आपल्या परिसरामध्ये कशाप्रकारे करणार आहात, याबाबतचा सविस्तर अभिप्राय. | |

टीपः आवश्यकतेनुसार स्वतंत्र पानाचा/पृष्ठाचा वापर करावा.

शेतक-याची सही -

शेतक-याचे नाव -

भ्रमणध्वनी क्रमांक -

## <u>प्रपत्र-५</u>
## प्रस्ताव तपासणी यादी

१. अभ्यास दौ-याकरीता जाणारा लाभार्थी हा स्वतः शेतकरी आहे / नाही.

२. शैक्षणिक अर्हता पूर्ण करत असल्याबाबतचे कागदपत्रे आहे.नाही/

३. शेतक-याने स्वयंघोषणापत्र प्रपत्र-१ जोडले आहे / नाही.

४. शेतक-याने स्वयंघोषणापत्र प्रपत्र-२ जोडले आहे / नाही.

५. स्वतःच्या नावे असलेला ७/१२ व ८-अ उता-याची चालू कालावधीची प्रत सोबत जोडली आहे/नाही.

६. उता-यावर नोंदविलेले क्षेत्र पिकाखालील आहे / नाही.

७. शेतक-याने उत्पन्नाचे मुख्य साधन शेती आहे, हे शेतक-याने स्वसाक्षांकित केले आहे / नाही.

८. शेतक-याने शिधापत्रिकेची प्रत जोडली आहे / नाही.

९. शेतक-याचे वय वर्ष २५ ते ६० या दरम्यान आहे / नाही.

१०. शेतकरी शासकीय, निमशासकीय, सहकारी, खाजगी संस्थेत नोकरीस तसेच वैद्यकीय क्षेत्रातील डॉक्टर, वकील, सीए (चार्टड अकाउंटंट), अभियंता, कंत्राटदार इ. व्यावसाईक आहे / नाही.

११. शेतकरी वैध पारपत्रधारक आहे / नाही.

१२. शेतक-याने यापूर्वी शासकीय (केंद्र/राज्य शासनाच्या कोणत्याही विभागामार्फत, कृषि विद्यापिठामार्फत तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत) अर्थसहाय्याने विदेश दौरा केला आहे / नाही.

१३. शेतकऱ्याने वैध वैद्यकीय प्रमाणपत्र जोडले आहे / नाही.

**तपासणी अधिकारी**

(तालुका कृषि अधिकारी, - -------------)

## प्रपत्र-६

**शेतक-यांच्या अभ्यास दौ-यांच्या प्रस्तावांवर विविध स्तरावर विहीत कालावधीत खालीलप्रमाणे करावयाची कार्यवाही करावी.**

| अ.क्र. | स्तर | करावयाची कार्यवाही | मुदत |
|---|---|---|---|
| १ | जिल्हा | जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी योजनेअंतर्गत शेतक-यांचे अर्ज मागविण्यासाठी स्थानिक वृत्तपत्रामधून व्यापक प्रसिध्दी द्यावी. | **दि.०५ फेब्रुवारी, २०२४ पर्यंत आयुक्तालयास शेतकरी याद्या सदर कराव्यात.** |
| २ | तालुका | तालुका स्तरावर प्रस्ताव स्विकारणे. प्राप्त झालेल्या प्रस्तावांची मार्गदर्शक सूचनेप्रमाणे तपासणी व छाननी करुन परिपूर्ण (पात्र) प्रस्ताव जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांच्याकडे पाठवणे. | |
| ३ | जिल्हा | तालुका स्तरावरुन प्राप्त झालेल्या पात्र शेतक-यांची सोडत पध्दतीने जेष्ठता क्रमवारी निश्चित करुन यादी करावी व विभागीय कृषि सहसंचालक यांच्याकडे प्रस्तावासह पाठवणे. | |
| ४ | विभाग | जिल्हा स्तरावरुन प्राप्त झालेले प्रस्ताव मार्गदर्शक सूचनेप्रमाणे आहेत काय, याची यादृच्छिक पद्धतीने (Randomly) तपासणी करुन प्रस्तावांच्या क्रमवारीसह कृषि आयुक्तालयास शिफारशीसह सादर करणे. | |

वरीलप्रमाणे नमूद क्षेत्रीय स्तरावरील सर्व प्रक्रिया पूर्ण करून दि ५ फेब्रुवारी २०२४ पर्यंत विभागीय कार्यालयांनी शेतकरी याद्या आयुक्तालयास सादर कराव्यात. या प्रक्रियेकरिता आवश्यक कालावधी व मुदतीबाबत विभागीय कृषीसहसंचालक स्तरावरून क्षेत्रीय कार्यालयांना सूचना निर्गमित कराव्यात. तसेच ई-निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यावर अभ्यास दौऱ्याकरिता देशांच्या समूहांची नावे आपणास कळविण्यात येतील.त्यानुसार विभागस्तरावर निवड करण्यात आलेल्या शेतकऱ्यांकडून सदर देशांच्या समूहाबाबत प्राधान्यक्रम तत्काळ उपलब्ध करून घ्यावा व आयुक्तालयास अहवाल सादर करावा.

**<u>प्रपत्र-७</u>**

**<u>प्रमाणपत्र</u>**

प्रमाणीत करण्यात येते की, राज्यातील शेतक-यांचे देशाबाहेर अभ्यास दौरे या योजनेअंतर्गत तालुका स्तरावर श्री./श्रीमती ---------------------------------------------------- रा. ----------------------------------- ता. ------------------ जि. ------------------- या शेतक-याचा प्राप्त झालेला प्रस्ताव तपासला असता योजनेच्या मार्गदर्शक सूचनेमध्ये नमूद केलेल्या शेतकरी निवडीचे निकष पूर्ण करीत असल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे सदर शेतकरी हे राज्यातील शेतक-यांचे देशाबाहेर अभ्यास दौरे या योजनेचा लाभ घेण्यास पात्र आहेत.

**स्थळ -** **तालुका कृषि अधिकारी,** -------------
**दिनांक-** **ता.** ------------- **, जिल्हा** -------------

**(जिल्हास्तरीय समितीने प्रतिस्वाक्षरीत करावे)**

**अध्यक्ष**
जिल्हास्तरीय समिती तथा
जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी

**सदस्य सचिव**
जिल्हास्तरीय समिती तथा
कृषि उपसंचालक, जिअकृअ कार्यालय

**प्रपत्र-८**

| अ.क्र. | शेतक-याचे नाव | स्त्री/ पुरुष | पूर्ण पत्ता | संवर्ग | जन्म दिनांक | वय | दूरध्वनी/ मोबाईल क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| | | | | | | | |

| Sr. No. | Farmers Name | Male/ Female | Farmers detail address | Category | Date of Birth | Age | Phone/ Mobile No. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| | | | | | | | |

## प्रपत्र-९

## विदेश अभ्यास दौ-यासंबंधीत शेतक-यांनी करावयाचा अर्ज

**प्रति,**

**मा.आयुक्त कृषी, म.रा.पुणे**
**मार्फत विभागीय कृषी सहसंचालक**

मी___________________________________वय____वर्षे,रा.__________ता._____________जि.______
______येथील रहिवासी असून कृषी विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या शेतकऱ्यांच्या देशाबाहेरील अभ्यासदौरे या योजनेंतर्गत लाभ घेण्यास इच्छुक आहे. तरी सदर योजनेकरिता माझा अर्ज स्वीकारण्यात यावा हि विनंती.

माझी माहिती खालीलप्रमाणे-

१) शेतक-याचे पूर्ण नाव (पारपत्राप्रमाणे) (स्त्री / पु ) :-

२) पूर्ण पत्ता / मोबाईल क्र./दूरध्वनी क्र. (एस.टी.डी. कोडसह) :-

३) जन्म तारीख व वय :-

४) शिक्षण :-

५) संवर्ग (अजा/अज/सर्वसाधारण/महिला) :-

६) शेतक-याच्या नावे असलेला चालू कालावधीचा ७/१२ व ८-अ च्या उता-याची प्रत. :-

७) शेतकरी कुटूंबाच्या शिधापत्रिकेची प्रत जोडावी. :-

८) वैध पारपत्राची पूर्ण झेरॉक्स प्रत जोडावी. :-

९) शेतक-याने स्वतः विमा पॉलीसी घेतली असल्यास कागदपत्र सादर करावे. :-

१०) आपत्कालिन परीस्थितीमध्ये जवळच्या दोन नातेवाईकांचे संपर्क पत्ते (नाव, पत्ता, संपर्क क्रमांक व ईमेल) :-

(शेतक-याची सही)
(नाव ------------------------------------------------ )

**शेतक-याने सदर अर्जासोबत खालील कागदपत्रे जोडावीत.**

१) स्वयंघोषणापत्र प्रपत्र-१
२) स्वयंघोषणापत्र प्रपत्र-२
३) वैध पारपत्राची झेरॉक्स प्रत
४) ७/१२ व ८-अ ची मूळ प्रत
५) शिधापत्रिकेची झेरॉक्स प्रत
६) अधार प्रमाणपत्राची झेरॉक्स प्रत
७) वैद्यकीय अधिका-याचे मूळ स्वास्थ्य प्रमाणपत्र

**प्रपत्र-१०**

**राज्यातील शेतक-यांचे देशाबाहेर अभ्यास दौरे योजनेअंतर्गत जिल्हानिहाय भौतिक लक्ष्यांक**

| **अ.क्र.** | **जिल्हा** | **भौतिक लक्ष्य** |
|---|---|---|
| १ | ठाणे | ०३ |
| २ | रायगड | ०३ |
| ३ | पालघर | ०३ |
| ४ | रत्नागिरी | ०३ |
| ५ | सिंधुदूर्ग | ०३ |
| **एकुण कोकण विभाग** | | **१५** |
| ६ | नाशिक | ०३ |
| ७ | जळगाव | ०३ |
| ८ | धुळे | ०३ |
| ९ | नंदुरबार | ०३ |
| **एकुण नाशिक विभाग** | | **१२** |
| १० | पुणे | ०३ |
| ११ | अहमदनगर | ०३ |
| १२ | सोलापूर | ०३ |
| **एकूण पुणे विभाग** | | **०९** |
| १३ | कोल्हापूर | ०३ |
| १४ | सातारा | ०३ |
| १५ | सांगली | ०३ |
| **एकूण कोल्हापूर विभाग** | | **०९** |
| १६ | औरंगाबाद | ०३ |
| १७ | जालना | ०३ |
| १८ | बीड | ०३ |
| **एकूण औरंगाबाद विभाग** | | **०९** |
| १९ | लातूर | ०३ |
| २० | उस्मानाबाद | ०३ |
| २१ | नांदेड | ०३ |
| २२ | परभणी | ०३ |
| २३ | हिंगोली | ०३ |
| **एकुण लातूर विभाग** | | **१५** |
| २४ | अमरावती | ०३ |
| २५ | बुलडाणा | ०३ |
| २६ | अकोला | ०३ |
| २७ | यवतमाळ | ०३ |
| २८ | वाशिम | ०३ |
| **एकूण अमरावती विभाग** | | **१५** |
| २९ | नागपूर | ०३ |
| ३० | वर्धा | ०३ |
| ३१ | भंडारा | ०३ |
| ३२ | गोंदिया | ०३ |
| ३३ | चंद्रपूर | ०३ |
| ३४ | गडचिरोली | ०३ |
| **एकूण नागपूर विभाग** | | **१८** |
| **एकुण महाराष्ट्र राज्य (अ)** | | **१०२** |
| **राज्यस्तरीय समितीद्वारे शिफारस करण्यात आलेली शेतकरी संख्या (ब)** | | **१८** |
| **एकूण शेतकरी संख्या ( अ + ब )** | | **१२०** |
| **अधिकारी संख्या** | | **०६** |

टीप: शेतकरी अभ्यास दौऱ्याचे आयोजन कमाल अनुदान मर्यादेपेक्षा कमी खर्चात झाल्यास( रु. १.०० लाख पेक्षा कमी ) शेतकरी संख्येमध्ये वाढ होऊ शकते.